# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**रूपये:- ८८,२९,०५,३३,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ५४६० | १० | बुलढाणा जिल्हयात मागील वर्षीच्या खरिपातील पिक महसूल मंडळात अतिवृष्टी व सततच्या पावसान उध्वस्थ झाले असुन पीक विमा कंपनीकडे शेतक-यांनी विहित मुदतीत पूर्वसूचना दाखल केल्या असुन बुलढाणा जिल्हयातील सततच्या पावसाने पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले सरासरी उत्पादन घट कमी येत असल्याने एका महिन्यांत शेतक-यांना सरसकट विमा देणे कंपनीला बंधनकारक असुनही याबाबत उचित कार्यवाही केली नाही त्यामुळे शेतक-यांमध्ये चिड निर्माण झाली असणे, करीता शेतकऱ्यांना पिक विमा मिळण्याबाबत तातडीने करा◌ावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (२) | ५४५९ | १० | जळगांव जिलहयात रावेर व यावल तालुकयात मोठया प्रमाणावर केळी पिकाची लागवड होत असुन हया हंगामात या रोगाचा प्रादुर्भाव झालेला असणे, तसेच नवीन लागवड केलेल्या केळी रोपामध्ये ईरव्हिनीयर रॉट या जीवणूजन्य रोगांची लागण झालेली असणे, केळी रोंपावर पडणारा जिवाणुजन्य रोग, केळीचा भाव, वाहतूक अशा कारणामुळे केळी उत्पादक शेतकरी तिहेरी संकटात सापडलेला असणे त्यामुळे शेतकरी अडचणी असलेलया शेतक-यांचे शोषण रोखण्या◌ाठी करावयाची कार्यवाही. |
| (३) | ५७१३ | १० | जळगांव जिल्हयातील केळी हे महत्वाचे पीक असुन केळी उप संशोधन केंद्राचे स्थलांतर व बळकटी करणाची आवश्यकता असुन मौजे हिंगोणा ता. यावल या ठिकाणी केळी उपसंशोधन करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत करावयाची कार्यवाही |
| | | | **श्री. संजय जगताप** |
| (४) | ५६६० | १० | राज्यात नागपूर, अमरावती, वर्धा या जिल्ह्यात सिट्रस इस्टेट स्थापन करण्याविषयी शासन निर्णय क्र. संप्रऊ-२०१८/प्र.क्र.८९/९-ए / कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई दि. ०७ मार्च २०१९ अन्वये फळरोपवाटीकांच्या जागेवर "सिट्रस इस्टेट" स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.त्याच धर्तीवर पुणे जिल्ह्यामध्ये विशेषत: |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | पुरंदर तालुक्यामध्ये सिताफळ फळ पिका खाली भरपूर प्रमाणात क्षेत्रलागवडी खाली असल्यामुळे पुरंदर तालुक्यतील शेतकऱ्यांचे मुख्य फळ पिक सिताफळ हे आहे त्याचप्रमाणे लगतच्या बारामती, इंदापूर, खेड, शिरूर, आंबेगाव, जुन्नर या तालुक्यामध्ये हि सिताफळाची लागवड आता मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे सिताफळच्या उत्पादकता व दर्जा वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण / मार्गदर्शन व नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार, टिकाऊ, मार्केटींग, प्रक्रिया यासाठी रोगमुक्त व गुणवत्ता पुर्वक कलमांची उपलब्धता होण्यासाठी शासकीय तालुका फळरोपवाटीका, जाधववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे. या क्षेत्रावर "सिताफळ इस्टेट" स्थापन करण्याबाबत निर्णय व्हावा, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५६६८ | १० | कृषी विभागांतर्गत मौजे - जाधववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे तालुका बीज गुणन प्रक्षेत्र एकूण ३२.३० हेक्टर क्षेत्रावर १९५८ पासून कार्यान्वित आहे. पुरंदर तालुक्यात सिताफळ व अंजीर यांची मोठया प्रमाणात लागवड होते. परंतु त्यासाठी आवश्यक असणारे दर्जेदार रोपांची उपलब्धता त्याप्रमाणात प्राप्त होत नाही. तरी कृषी विभागाकडे असलेले १२.३० हेक्टर क्षेत्र व अजीर, सिताफळ संशोधन केंद्र यांचे २०.०० हेक्टर क्षेत्रावर महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी व महाराष्ट्र शासन कृषि विभाग यांच्या संयुक्तपणे शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळण्यासाठी व सुधारीत व संशोधित रोपांचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाच्या तालुका बीज गुणन प्रक्षेत्र जाधववाडीचे शासकीय फळ रोपवाटीकामध्ये रुपांतर करण्याचा प्रकल्प अहवाल कृषि संचालकाकडे सादर केलेला आहे. सदरचा प्रकल्प मूल्य २५४.३७ लक्ष रुपये इतका आहे. परंतु अद्यापही या प्रस्तावाला मंजूरी मिळालेली नाही. सदर प्रस्तावाची फाईल क्र. २०२५/प्र.क. २५/१३ अ कृषी विभागाकडून मा. कृषी मंत्री महोदयांच्या मंजूरीसाठी दि.२१ मे,२०२१ पासून प्रलंबित आहे. मी यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. तरी अद्यापही कोणतीच कार्यवाही नसल्याने यावर निर्णय व्हावा, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (६) | ५४३२ | १० | अमरावती जिल्हयात स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत विमा कंपनीकडे १८९ प्रकरणे पाठविण्यात आली त्यापेकी मागील वर्षभरात केवळ ६० प्रकरणेच मंजूर झाली असणे, शेती व्यवसाय करतांना विविधी प्रकारचे अपघात होण्याची शक्यता असतो अशा अपघातात मृत्यु झाल्यास किंवा अपंगत्व ओढविल्यास कुटूंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणी निर्माण होतात याकरिता अपघातग्रसत शेतकरी किंवा त्यांच्या कुटूंबियास आर्थिक लाभ मिळावा या करिता सदरहू स्व. गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना आहे परंतू अमरावती जिल्हयात मागील वर्षभरात ५५ टक्के प्रकरणे प्रलंबित असल्याने या योजनेच्या लाभापासून वंचित राहिलेल्या शेतकरी व कुटूंबियांची अपघात विमा देण्याबाबत करावयाची कार्यवाही |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ५४३३ | १० | अमरावती जिल्हयात मागील वर्षीच्या खरिपातील पिक महसूल मंडळात अतिवृष्टी व सततच्या पावसाने उध्वस्थ झाले असुन पीक विमा कंपनीकडे १.२६ लाख शेतक-यांनी विहित मुदतीत पूर्वसूचना दाखल केल्या असुन त्यापैकी तब्बल २६,३८४ अर्ज कंपनी स्तरावर नाकारण्यात आले आहे हे अर्ज ग्राहय धरण्यात यावेत यासाठी अधिका-यांनी सूचना दिल्या असतानाही कंपनीने नाकारल्या असल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी सुमारास आले असणे, अमरावती जिल्हयातील ८४ महसूल मंडळात अतिवृष्टी व सततच्या पावसाने सोयाबीन पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले सरासरी उत्पादन ५० टक्क्यांनी कमी येत असल्याने संबंधित जिल्हाधिका-यांनी ८० महसूल मंडळासाठी अधिसूचना जाहीर केली त्यानंतर एका महिन्यांत शेतक-यांना सरसकट विमा देणे कंपनीला बंधनकारक असुनही याबाबत उचित कार्यवाही केली नाही त्यामुळे शेतक-यांमध्ये चिड निर्माण झाली असणे, करीता शेतकऱ्यांना पिक विमा मिळण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (८) | ५५०२ | १० | "राज्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांना कोणताही लाभ न मिळता निम्म्यापेक्षा अधिक रक्कम विमा कंपन्यांच्या घशात जात असल्याचे धक्कादायक बाब उघडकीस येणे, पंतप्रधान पीक विमा योजना व हवामानावर आधारीत फळपीक विमा योजनेत सरकारी विमा हप्ता शेतकऱ्यांचा बँक खात्यात थेट जमा न होता विमा कंपन्याना आधीच मिळणे, केंद्र व राज्य शासनाच्या वेगवेगळया धोरणात्मक वाटचालीवर पिक विमा योजनेचे भवितव्य अवलंबून असल्याने पिक विमा योजनेचा निधी शेतकऱ्यांना अल्प प्रमाणात मिळणे, पिक विमा कंपन्यांनी मात्र कॉर्पोरेट निती अवलंबविल्याने शेतकऱ्यांऐवजी कंपन्यांना भरपूर फायदा होणे, पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाची दाद मागण्याची कोणतीही सोय शेतकऱ्यांना नसणे व शासनही या योजनेसंदर्भात पिक विमा कंपन्यावर देखरेख अथवा निमंत्रण करीत नसल्याचे कॅग ने आपल्या अहवालात आक्षेप घेणे, गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत शेतकरी व शासनाच्या प्रिमियम हप्त्यापोटी विमा कंपन्यांच्या खात्यांत हजारो कोटी रुपये जमा होणे, मात्र शेतकऱ्यांना विम्याचा लाभ देण्यासाठीच्या पीक कापणी प्रयोगात अनेक त्रुटी असल्याने विमा कंपच्या चुकीचे उत्पादन दाखवून शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवत असणे, त्यामुळे पीक विमा योजनेत भ्रष्टाचार आहे की, योजनाच मुळात भ्रष्ट आहे अशी शंका येणे, दरवर्षी शेतपिकांचे नुकसान होत असताना विमा कंपन्या मात्र प्रचंड नफ्यात असणे, शेतकन्यांना वेळोवेळी नुकसान भरपाई देण्याबाबत पीक विमा कंपन्या उदासीन असणे त्यामुळे शेतकन्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण परिणामी घेत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (९) | ५५०४ | १० | "देशातील सर्वच राज्यांसकट महाराष्ट्रातील शेकतऱ्यांचे जीवनमान उंचावण्याची तसेच शेतमालाचे दुप्पट दाम देण्याची मा.पंतप्रधान यांनी घोषणा केलेली असणे, मात्र महाराष्ट्र तुलनेत मागे पडल्यामुळे शेतकऱ्यांपुढे अनेक समस्यांचे डोंगर उभे |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस आलेली असणे, शेजारच्या तेलंगणा तसेच हरियाणा, गुजरात इत्यादी राज्यांना केंद्र शासनाने मदत केली त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याला मदत मिळालेली नसणे, हरियाणा व गुजरात प्रमाणे 90 टक्के अनुदानावर ट्रॅक्टर, ठिबक सिंचन व इतर सुविधा देण्याबाबत राज्यातील शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी, तेलंगणा सरकारने सन 2018 पासून 18 ते 59 वर्षे वयाच्या शेतकऱ्यांसाठी लागू केलेली रयतू विमा योजनेप्रमाणे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी अशा प्रकारची योजना राबविण्याची आवश्यकता, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथ उपाययोजना" |
| (१०) | ५५०५ | १० | "राज्यात कृषी सहाय्यक या पदाची 1757 पदे रिक्त असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस आलेली असणे, रिक्त पदांमुळे कृषी खात्याचा कारभार खिळखिळा झालेला असणे, पुणे विभागात 259, कोल्हापूर विभागात 215, ठाणे विभागात 288, नाशिक विभागात 287, औरंगाबाद विभागात 134, लातूर विभागात 80, अमरावती विभागात 141, तर नागपूर विभागात 353 असे एकूण 1757 पदे रिक्त असणे, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांना सेवा मिळण्यात अडचणी येत असताना शासनाचे कृषी सेवकांची, सहायकांची पदभरती करण्याकडे दुर्लक्ष झालेले असणे, राज्यात सदरची पदे रिक्त असल्याने योजना राबविण्यात अडचणी येत असणे, परिणामी राज्यातील विशेषतः शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची भावना, तसेच बेरोजगारांच्या हाताला काम मिळत नसल्यामुळे बेरोजगार तरुणांच्या मनात देखील राज्य शासनाच्या बद्दल निर्माण झालेली संतापाची भावना, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (११) | ५५०६ | १० | "राज्यातील कृषी उपसंचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांना पदोन्नती देताना मूळ यादीतील पदांमध्ये फेरफार करण्यात आला असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीला येणे, पदोन्नतीची नस्ती मुख्यमंत्री कार्यालयात पाठवताना प्रशासनाने सुचविलेली पदे व ठिकाण बदलण्यात आल्यामुळे राज्यातील कृषी विभागातील अधिकारी वर्गामध्ये राज्य शासनाबद्दल पसरलेली तीव्र नाराजीची भावना, कृषी खात्यातील उपसंचालक दर्जाच्या 81 अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यास शासनाने मंजुरी दिलेली असणे, तथापि अंतिम आदेशाची फाईल चार महिन्यांपासून दाबून ठेवण्यात आलेली असणे, यासंदर्भात विभागातील अधिकाऱ्यांनी वेळोवेळी केलेल्या तक्रारी, संघटनेने पुकारलेले काम बंद आंदोलन, काही अधिकारी अल्पावधीतच सेवानिवृत्त होत असलेने सेवानिवृत्ती पुर्वी पदोन्नती होणेची त्यांची मागणी, त्यामुळे राज्यातील महत्त्वाच्या व शेतकऱ्यांशी संबंधित असलेल्या कृषी विभागातील अनागोंदी समोर आलेली असणे, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना वर्गणी दिल्याशिवाय पदोन्नती मिळण्याची शक्यता नसणे, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या कृषी अधिकाऱ्यांमध्ये पसरलेली संतापाची लाट, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१२) | ५५०८ | १० | "बीड जिल्ह्यातील तब्बल बारा हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर माहे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात बजाज अलायन्स या विमा कंपनीने प्राधिकृत केलेल्या बँकेकडून बारा कोटी रुपये चुकीने जमा झाली असल्याची धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, सदर रक्कम संबंधितांकडून वसूल करण्यासाठी अकरा बँकांना विमा कंपनीने पत्र पाठवलेले असणे, तथापि या शेतकऱ्यांना बँकांच्या चुकीमुळे आपले खाते एन.पी.ए. मध्ये जाण्याची, आपला सिबिल स्कोर कमी होण्याची भीती निर्माण झालेली असणे, तसेच या रकमेवर व्याज लावल्या जाण्याची निर्माण झालेली भीती तसेच भविष्यात कर्ज मिळेल की नाही याबद्दल भीती निर्माण झाली असून आता या शेतकऱ्यांना कोणत्याही योजना किंवा कोणतेही कर्ज मंजूर होत नसल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये शासनाच्या बद्दल पसरलेली नाराजीची भावना, अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही बँकेकडून चुकीच्या पध्दतीने विमाचे पैसे जमा करणे व वसूल करणेच्या घटना झाल्या असल्याची भिती, भविष्यातही या रक्कमांची वसूली होणेची शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (१३) | ५५१० | १० | राज्यामध्ये चालू वर्ष हे पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरविले असताना "मिलेट मिशन" साठी रु.200 कोटीची तरतुद करण्यात आलेली असणे, यामध्ये तृणधान्य प्रक्रीया उद्योजकांना अर्थसहाय्य पंतप्रधान सुक्ष्म अन्न प्रक्रीया, मुख्यमंत्री अन्न प्रक्रीया योजना व स्मार्ट प्रकल्प यांची सांगड घालण्यात आलेली असणे, तृणधान्य पिकांचे उत्पादन व त्यांची विक्री यांची मूल्य साखळी विकसित करण्यासाठी सदरचे 200 कोटी रूपयांची तरतूद केलेली असणे, घोषित करण्यात आलेले रु.200 कोटी रुपये तृणधान्य प्रक्रीया उद्योग, पंतप्रधान सुक्ष्म अन्न प्रक्रीया, मुख्यमंत्री अन्न प्रक्रीया व स्मार्ट योजनांची सांगड घालून (Convergence) देण्यात येणार असणे, सद्य:स्थितीत सुरू असलेल्या या योजनांची अनुदानाची रक्कम एकत्र करून शासनाने 200 कोटी रुपये घोषीत करून शेतकऱ्यांच्या डोळयात धूळफेक केलेली असणे, वरील सर्व योजना व्यतिरीक्त शासन या मिलेट मिशन साठी रु.200 कोटीची वेगळी तरतूद अर्थसंकल्पात करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| | | | **ॲड. अशोक पवार** |
| (१४) | ५४६१ | १० | शिरुर – हवेली (जि.पुणे) मतदारसंघात शिरुर येथील कृषि उत्पन्न बाजार समितीत शेतकरी भाजीपाला विक्रीसाठी घेऊन येत असणे, या शेतकऱ्यांना याठिकाणी राहण्याची कोणती सोय उपलब्ध नसणे, त्यामुळे शेतकऱ्यांना ताटकळत रहावे लागत असणे, या शेतकऱ्यांच्या राहण्याची सोय व्हावी याकरिता शिरुर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये कृषि भवन बांधण्याची आवश्यकता असणे, यासाठी कृषि भवन बांधण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (१५) | ५३६९ | १० | जळगाव जिल्ह्यात ४१२ स्वयंचलित हवामान केंद्र उभी करण्याबाबत शासनाने घोषणा केली असणे, यासाठी जागा शोधून त्याची माहिती सादर करण्याच्या सूचनाही |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाला दिल्या असणे, मात्र अद्यापही निकषानुसार जागांचा शोध सुरूच असून जागा कधी शोधणार अन् केंद्र कधी उभारणार, असा प्रश्न निर्माण झाला असणे, केवळ जागेची माहिती पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या असून हे केंद्र कोण उभारणार, त्यासाठी किती खर्च लागणार याबाबत अद्यापही स्पष्ट सूचना नसल्याने पावसाळयापूर्वी सदर केंद्रे उभी करणेबाबत शासनाने करावायची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (१६) | ५५६९ | १० | कृषि अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी गेल्या ३४ दिवसांपासून विविध मागण्यासाठी चारही कृषी विद्यापीठात धरणे,आंदोलन/साखळी पध्दतीने उपोषण करत आहेत. कृषी अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांची मागणी आहे की, महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र कृषि अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करावे, लवकरात लवकर महाराष्ट्र राज्यात स्वंतत्र कृषी अभियांत्रिकी संचालनालय स्थापन करण्यासाठी समिती स्थापन करावी व कृषी अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना न्याय द्यावा. तसेच महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र कृषी अभियंत्रिकी पदवी असतानाही मृद व जलसंधारण विभागात कृषी अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी पात्र का नाहीत ? कृषी अभियंत्यांना संधी का दिली जात नाही ? कृषी अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना पात्र करुन भरती प्रक्रिया राबविण्यात यावी ही मागणी सरकारकडे कृषी अभियंते करत आहेत. महाराष्ट्र कृषि सेवा परिक्षा २०२१ आणि २०२२ च्या दोन्हीही परीक्षा तशाच चालू ठेवल्यास त्या माध्मातून भरल्या जाणाऱ्या ४१७ पदांमध्ये कृषी अभियंत्यांचे प्रमाण अतिशय नगण्य राहून महाराष्ट्रातील पुढील ३० वर्षांच्या कृषि क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाची असलेली जोड पूर्णपणे थांबून त्याचा महाराष्ट्रातल्या कृषी क्षेत्राला मोठा फटका बसू शकतो. त्यासाठी या परिक्षांना स्थगिती देऊन पुन्हा जुन्या पध्दतीच्या अभ्यासक्रमानुसार किंवा नवीन पध्दतीचा अभ्यासक्रम हा चारही विद्यापिठांच्या कुलगुरुंच्या मार्फत तयार करुन त्यानंतर या परीक्षा पुन्हा घेण्यात याव्यात. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा मुख्य परिक्षेला (वर्णनात्मक) कृषि अभियांत्रिकी शाखेचा वैकल्पिक विषय इतर शाखांप्रमाणेच समाविष्ट करण्यांत यावा,यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ५५७० | १० | गेल्या वर्षी एप्रिल-मे 2022 मध्ये कापसाचे भाव प्रती विंक्टल रु.13000/- पर्यंत होते. कापुस हंगाम सुरु झाल्यानंतर ऑक्टोबर,2022 मध्ये रु.12000 पर्यंत प्रती विंक्टल भाव होते. ते फार कमी कालावधीसाठी होते. त्यानंतर कापसाच्या दरात घसरण होऊन सध्या रु.7500 ते 8000 प्रती विंक्टल भाव होते. सदरचे भाव शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे गेल्या 4/5 महिन्यांपासून शेतकरी कापसाची विक्री कमी प्रमाणात करीत आहे. सध्या शेतकऱ्यांच्या घरात 55 ते 60 टक्के कापुस शिल्लक आहे. कापसाची विक्री होत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आलेला आहे. खान्देश, मराठवाडा, विदर्भ या भागात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते. कॉटन कॉर्प्रोरेशन (C.C.I.) चे भाव प्रती विंक्टल रु.6500/- ते 7000/- पर्यंत आहेत ते शेतकऱ्यांना परवडत नाही. केंद्र किंवा राज्य सरकारने रु.9500/- ते रु.10000/- |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | च्या प्रती विंक्टल दराने कापूस खरेदी केल्यास शेतकऱ्यांना फायदेशीर ठरेल. यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१८) | ५३३७ | १० | राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून द्राक्ष बागांसाठी प्लास्टिक पेपर कव्हरींगकरीता अनुदान मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २६ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री कृषी यांचेकडे मागणी केलेली असणे, मागील काही वर्षांपासून सततचा अवकाळी पाऊस, गारपीट, ढगाळ हवामान, तापमानातील चढ-उतार या नैसर्गिक संकटांमुळे द्राक्ष शेती धोक्यात आलेली असणे, अवकाळी पाऊस गारपीट झाली की शेतकऱ्यांकडून सरकारकडे नुकसान भरपाईची अपेक्षा केली जाते असणे, दरवर्षी नुकसानभरपाई देणे हे सुद्धा शासनासाठी सोपे नसणे, त्यामुळे या सततच्या नैसर्गिक आपत्तीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी द्राक्षबागेचे संरक्षित व्यवस्थापन करण्याचा द्राक्ष बागाईतदार संघाचा प्रस्ताव असणे, कमीत कमी खर्चात आणि द्राक्षांसाठी फायदेशीर असा प्लास्टिक पेपर कव्हरचा प्रस्ताव हा शेतकऱ्यांसाठी निश्चितच फायदेशीर असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघ पुणे यांच्या मागणीप्रमाणे राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून द्राक्ष बागांसाठी प्लास्टिक पेपर कव्हरिंगकरिता अनुदान देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (१९) | ५४०५ | १०० | पीकविमा कंपन्यांकडून होत असलेली नफेखोरी व त्यामुळे सातत्याने अडचणीत येत असलेले शेतकरी यावर उपययोजना म्हणून प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत 80-110 हा विशेष बीड पॅटर्न राबवला असणे, या पॅटर्न मुळे विमा कंपनीच्या नफेखोरीला आळा बसून शेतकरी व राज्य शासन या दोघांनाही फायदा मिळणे अभिप्रेत असणे व यासाठी संपूर्ण राज्यात एकच विमा पॅटर्न व एकच कंपनी नेमण्याबाबत लोकप्रतिनिधी व शेतकरी संघटनांकडून सातत्याने होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२०) | ५३४४ | १० | राज्यात दिंनाक ५ व ६ मार्च २०२३ या गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या गारपिट, वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे वाशिम, पालघर, संभाजीनगर, नाशिक, धुळे, जळगाव नंदुरबार सह राज्यातील अनेक भागातील कांदा, पपई, केळी या पिकासह गहू, हरभरासह अनेक रब्बी पिके उध्वस्त झालेली असून त्यामुळे शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढावलेले असल्याची माहिती माहे दिंनाक ७ मार्च २०२३ रोजी निर्देशनास येणे, शेतकऱ्यांच्या मालाला अगोदरच कवडीमोल भाव मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील उभ्या पिकावर टॅक्टर फिरवून पिक नष्ट करीत असल्याच्या घटना निर्देशनास येणे,या सर्व प्रकारामुळे शेतकऱ्यांच्या कुटूंबावर आर्थिक संकट कोसळलेले असतांनाच अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे हाती आलेले पिक पुर्णत: उध्वस्त होणे, या अवकाळी पावसाच्या अस्मानी संकटाने शेतकऱ्यांच्या डोळयात अश्रू आणले असून |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शेतकऱ्यांना सरसकट आर्थीक मदत देण्याबाबत शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यामध्ये पसरत असलेले तिव्र असंतोष व भितीचे वातावरण परिणामी या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने सर्व्हे करून शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार रूपये हेक्टरी मदत देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| (२१) | ५३४५ | १० | शेतकऱ्यांच्या आर्थिक साक्षरतेबाबतचे अज्ञान आणि शासनाच्या संबंधित विभाग आणि पिक विमा कंपनीच्या संगनमताने केलेल्या लबाडीमुळे जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यभरातील अनेक शेतकरी अतिवृष्टी मुळे झालेल्या नुकसान भरपाई पासून वंचित राहत असणे, मागील वर्षी अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळातील पिकांचे नुकसान झाल्याने व शासनाने सरसकट नुकसान भरपाई आणि हेक्टरी मदत देण्याचे जाहीर केल्यानंतरही पिक विमा कंपनीने अनेक महसूल मंडळांना देय लाभातून वगळले असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास येणे विमा परताव्याचे पीक निहाय प्रमाण 25% की 75 टक्के यामध्ये संबंधित यंत्रणांचा परस्परांमध्ये ताळमेळ नसणे, परिणामी अनेक शेतकरी शासनाने जाहीर करून देखील मिळणाऱ्या मदतीपासून पिक विमा कंपनीद्वारे तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरविले जात असणे, यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक लुबाडणूक होत असल्याचे स्पष्ट होणे, पिक विमा कंपनीच्या चुकीच्या कार्यपद्धती बद्दल शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेला तीव्र असंतोष व त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना |
| (२२) | ५३४८ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली, मूल, ब्रम्हपूरी, सिंदेवाही, नागभीड यासह तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेऊन नियमित भरलेले असणे, अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन रक्कम देण्यात यावे असे शासनाचे स्पष्ट आदेश असतानांही चंद्रपूर जिल्हयातील नियमित कर्ज भरणाऱ्या हजारो शेतकऱ्यांना त्या योजनेचा लाभ अद्यापही मिळालेला नसल्याची धक्कादायक माहिती माहे १५ फेब्रुवारी २०२३ च्या सुमारास निर्देशनास येणे, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेअंतर्गत असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या हजारो शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेऊन नियमित कर्ज जमा केले, अशा शेतकऱ्यांना सुध्दा ५० हजार रुपये प्रोत्साहन रक्कम मिळणे आवश्यक असतानाही अद्यापपर्यंत त्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन भत्ता मिळालेला नसणे, सदरील शेतकऱ्यांमध्ये वेळेवर कर्ज भरुनही महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५० हजार रुपयांचा लाभ मिळत नसल्याने जिल्हयातील शेतकऱ्यांत पसरत असलेला तिव्र असंतोष व सतापाचे वातावरण परिणामी याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५० हजार रूपये मिळण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.” |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२३) | ५३८७ | १० | स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेअंतर्गत जिल्ह्यातून विमा कंपनीकडे १८९ प्रकरणे सादर असणे , या योजनेअंतर्गत कार्यरत कंपनीमार्फत सदर प्रकाराने निकाली काढण्याबाबत प्रचंड विलंब होत असणे , जिल्ह्यातील १८९ प्रकारणांपैकी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | केवळ ६५ प्रकरणे मंजूर झाली असून ९५ प्रकरणे प्रलंबित आणि २९ प्रकरणे नामंजूर केलेली असणे , सदर प्रकाराने प्रलंबित असल्याने मोठ्या प्रमाणावर अपघातग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबास नाहक त्रास सहन करावा लागत असणे , याबाबत सदर योजनेची कार्यपद्दती बदलवून प्रलंबित प्रकराणे निकाली काढण्याची नितान्त आवश्यकता , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ५३९९ | १० | अमरावती जिल्ह्यात सततच्या बदलत्या वातावरणामुळे ७० हजार हेक्टर क्षेत्रातील ६२ टक्के तूर बाधित झाली असुन शेतकऱ्यांच्या शेतातील तुरीचे उभे पीक वाळलेले असणे , अमरावती जिल्हयातील बहुतांश भागात तुरीच्या उत्पादनाची सरासरी घसरली असुन अनेक भागात तूर जळाल्या आहेत स्थानिक लोकप्रतिनिधी तथा जिल्ह्यातील शेतक-यांच्या तक्रारीनंतर कृषी विभागाने पाहणी करुन नुकसानीचे पंचनामे जिल्हा प्रशासनास सादर असून अमरावती जिलहयात एकूण तूर पेरणी क्षेत्रापैकी ६२ टक्के क्षेत्रातील तूर उध्वस्त झाली असणे , सदर नुकसाग्रस्त तुरीच्या पिकास नुकसानभरपाई देण्याबाबत तूर उत्पादक शेतकऱ्यांची मागणी असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२५) | ५४०४ | १० | अमरावती जिल्हयात सततच्या पाऊस व अतिवृष्टीमुळे खरीप 2022 च्या हंगामात पिकांचे नुकसान झाल्यामुळे तब्बल 1,25,902 शेतक-यांनी पूर्वसुचना कंपनीकडे दाखल केल्या असणे कंपनीने विविध कारणांनी 26,334 पूर्वसुचना कंपनीव्दारा अपात्र ठरविल्या असणे , या सर्व अर्जांची पुन्हा पाहणी करण्याचे आदेश कृषी आयुक्तांनी दिले असताना त्यास कंपनीव्दारा दुर्लक्षित करण्यात आलेले असणे , शेतक-यांची फसवणूक करणा-या या कंपनी विरोधात कार्यवाही करून पीक विम्याच्या परताव्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| (२६) | ५४१२ | १० | विदर्भात विशेषता पश्चिम विदर्भात अमरावती यवतमाळ वाशीम अकोला बुलढाणा या भाग मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होत असून राज्यात कापसाला अपेक्षित दर मिळत नसल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी चिंतेत असणे , साखरे प्रमाणेच कापसासाठी नियमीत असे निर्यात धोरण आखण्याची गरज निर्माण झाली असून त्यामुळे राज्यातील कापूस उत्पादकांना दिलासा मिळणार असणे , शासनाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेवून साखरेच्या धर्तीवर कापूस निर्यातीवर अनुदान देण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४१५, कृषि विषयक संशोधन व शिक्षण**<br>**रूपये:- १८,९१,५५,३५,०००/-**<br>**श्री. अनिल पाटील** |
| (२७) | ५३५४ | १० | राहुरी जिल्हा अहमदनगर येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विभाजन करून जळगाव येथे कृषी विद्यापीठ उभारण्याबाबत शासनाने घोषणा केली असणे, सदरील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | घोषणेबाबत अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसून सदर विद्यापीठाच्या जळगाव येथील स्थापनेबाबत शासनाची भूमिका 1891,55,35 दत्तमत 2415, कृषि वि षयक संशो धन व शि क्षण |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२८) | ५३४३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही तालुक्यातील शेतकऱ्यांना तालुका स्तरावर शासनाच्या विविध योजनेची माहिती मिळावी, शेती विषयक नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळावी यासाठी तालुक्याच्या ठिकाणी कृषी भवन निर्माण करणे अत्यंत आवश्यक असणे, यासाठी शेतकरी वर्गानी मागणी करणे, शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने जिल्हा कृषी अधिक्षक चंद्रपूर यांनी ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथे कृषी भवन बांधकाम करण्यासाठीचा रितसर प्रस्ताव तयार करून विभागाच्या मार्फतीने अप्पर मुख्य सचिव कृषी विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे पाठविणे, या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यतेसाठी कृषी विभाग मंत्रालय मुंबई या कार्यालयाकडे अनेक महिन्यापासून प्रलंबित असणे, शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी व उन्नतीसाठी कृषी भवनाची आवश्यकता असतांना सुध्दा गेल्या अनेक महिन्यापासून तीनही प्रस्ताव प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांत पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथे कृषी भवन बांधकाम करण्याच्या कृषी विभाग मंत्रालय मुंबई येथे प्रलंबित असलेल्या प्रस्तावास मंजूर करुन प्रशासकीय मान्यता देणे तसेच याकामासाठी निधी उपलब्ध करूण देणे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **मागणी क्रमांक: डी-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**रूपये:- १६,९८,०२,३४,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२९) | ५४३८ | १० | अमरावती जिल्हयात लम्पी चर्मरोगाची प्रादुर्भावामुळे पशुसंवर्धन विभागातील विविध संवर्गातील 3 हजार 193 पदे रिक्त असणे, रिक्त पदांमुळे पुशपालकांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत शासनाने यासंदर्भात माहिती व निर्णय घेऊन सदरील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| (३०) | ५४४३ | १० | अमरावती जिल्हयातील औषधाचा ग्रामीण भागात तुडवडा असल्याने नगारिकांना औषधी बाहेरुन आणावी लागत असणे, औषधे उपलब्ध करुन कृत्रिम टंचाई पशुवैद्यकीय दवाखान्यात निर्माण करणे, मोझरी, कुऱ्हा येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-1 मध्ये करण्यात यावी अशी मागणी असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३१) | ५५१६ | १० | ‘अंड्याचे मनमानी दर’ जाहीर होत असल्यामुळे राज्यातील कुक्कुट पालक शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असल्याची बाब नुकतीच उघडकीला येणे, राष्ट्रीय |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अंडी समिती (एनइसीसी) कडून अंड्याचे दर अचानक कमी केल्याने राज्यातील कुक्कुटपालक शेतकरी अडचणीत आले असणे, परिणामी पक्षी पालकांचे भविष्यात फार मोठे आर्थिक नुकसान होणार असणे, कोणत्याही ठोस कारणाशिवाय अंड्याचे दर अचानक कमी केले जात असल्याकडे संबंधित मंत्र्यांकडे निवेदन देऊनही त्याच्या संदर्भात शासनाच्या संबंधित विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, कोणत्याही कायदेशीर अधिकाराशिवाय राष्ट्रीय अंडी समिती अंड्याचे दर कोणत्याही प्रकारच्या शास्त्रोक्त अभ्यासाशिवाय जाहीर करत असल्याची प्रथा थांबण्याची आवश्यकता, गेल्या काही दिवसांपासून राज्यात दररोज सव्वा कोटी अंड्यांचा तुटवडा असताना आणि उत्पादन खर्चात अचानक वाढ होत असताना राष्ट्रीय अंडी समन्वय समिती, अंडी उत्पादन खर्च, मागणी आणि पुरवठा अशा कोणत्याही वास्तविक माहितीच्या आधारावर दर जाहीर करत नसणे, ही संस्था कुक्कुटपालकांच्या ऐवजी व्यापाऱ्यांच्या बाजूने काम करीत असणे, त्यामुळे पक्षी पालकांचे होत असलेले नुकसान टाळण्यासाठी राज्य सरकारने हस्तक्षेप करण्याची आवश्यकता, अंड्यांची किमान आधारभूत किंमत ठरण्यासाठी कायदेशीर संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनामध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (३२) | ५३४२ | १० | राज्यात अस्तित्वात असलेल्या एकूण २८४१ श्रेणी २ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ४२८ संस्थांचा दर्जावाढ करून त्यांचे रुपांतर श्रेणी १ च्या पशुवैद्यकीय दवाखान्यात करणेसाठी नवीन पदे निर्माण करण्याकरिता शासनाने दि. ११ नोव्हेंबर २०२० रोजी आयुक्त पशुसंवर्धन पुणे यांचेकडून प्रस्ताव मागवलेला असणे, पशुसंवर्धन आयुक्त पुणे यांच्याकडून प्रस्ताव मागवून राज्यातील ४२८ श्रेणी २ पशुवैद्यकीय दवाखन्यांचे श्रेणी १ मध्ये रुपांतर करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (३३) | ५४०१ | १०० | लंपी आजाराने दगवलेल्या पशु धनास त्यांच्या पशुपालकांना राज्य शासनाने विशेष अनुदान देण्याचा निर्णय घेतला असणे, मात्र या निर्णयाद्वारे पशुपालकांना केवळ 25 ते 30 हजार रुपये दिले जात असणे, मात्र ही रक्कम पशु धन विकत घेण्यास अत्यंत अपुरी असल्याने मयत जनावरांच्या पशुपालकांना मोठ्या पशूंसाठी प्रत्येकी किमान 1 लाख रुपये अनुदान देण्यात यावे, अशी होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (३४) | ५४०३ | १०० | बीड जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ येथे तालुका पशु वैद्यकीय दवाखाना असलेली जागा अत्यंत अपुरी असल्याने नवीन जागेत स्थलांतर करण्याचा प्रस्ताव मागील काही वर्षांपासून प्रलंबित असणे, सदर तालुका पशु वैद्यकीय दवाखान्यास जलसंपदा विभागच्या वापरात नसलेल्या जागेत विकसित करून स्थलांतर करण्याचा प्रस्ताव |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | राज्य शासनाकडे सादर असणे, सदर जागा जलसंपदा विभागाकडून हस्तांतरित करून घेऊन त्या जागेत तालुका पशु वैद्यकीय चिकित्सालय उभारण्यात यावे, अशी लोकप्रतिनिधीनी केलेली मागणी, पशूंवरील योग्य इलाजाची निकड पूर्ण करण्याची गरज, यावर करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (३५) | ५३८१ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुकयामधील पशुसंवर्धन विभागा अंतर्गत मंजूर ७८ असतांना त्यामधील ४१ पदे रिक्त असल्याने रिक्त पदे त्वरीत भरण्याची आवश्यकता व याबाबत करावयाची कार्यवाही |
| (३६) | ५३८२ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुक्यात पशुवैद्यकीय चे ३६ दवाखाने मंजूर असुन त्यातील आजस्थितीत फक्त २३ पशुवैद्यकीय दवाखाने सुरु असणे, १३ दवाखाने अद्यापही सुरु करण्यात न आल्याने सदरचे दवाखाने त्वरीत सुरु करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया |
| | | | **मागणी क्रमांक: डी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०५, मत्स्यव्यवसाय**<br>**रूपये:- ४,५६,५३,८२,०००/-**<br>**श्री. अमिन पटेल** |
| (३७) | ५४०८ | १० | महाराष्ट्राच्या समुद्रकिनाऱ्यावर मोठया प्रमाणात प्लॅस्टीक कचरा साठणे, समुद्रात येणाऱ्या जहाजातून तेल गळती होणे, सांडपाणी, रासायनिक पाणी समुद्रात सोडले जाणे, समुद्रात मोठयाप्रमाणात जलप्रदूषण होणे, त्यामुळे मासेमारी करुन उपजिवीका करणाऱ्या मच्छिमार बांधवावार उपासमारीची वेळ येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ५४०९ | १० | महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीची सुरक्षा धोक्यात असणे,एलईडी दिव्यांच्या मदतीने अवैद्य मासेमारी होणे, एकाच परवान्यावर अनेक ट्रॉलर्स मासेमारी करणे, मासेमारी करण्यासाठी पर्सेसिएन नेट वापरण्यात येणे, परप्रांतिय नौका विना परवाना सांगरी हद्दीत घुसणे, गस्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई न होणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (३९) | ५५१४ | १० | कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग शासन निर्णय दिनांक०३.०७.२०१९ नुसार राज्यात मत्स्य व्यवसायाकरिता जलाशय / तलाव मासेमारीकरिता ठेक्याने देणेबाबतचे सुधारित धोरण लागू करण्यात येणे. सदर शासन निर्णय सर्वसमावेक्षक करण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी/मच्छीमार संघटना यांचे निवेदनांचा विचार या धोरणात विचार केलेला दिसून येणे, कृषी, पशुसंवर्धन, मत्सयव्यवसाय दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग शासन निर्णय दिनांक ०३.०७.२०१९ च्या शासन निर्णयामध्ये मात्र काही सुधारणा करण्याच्या अनुषंगाने दिनांक ०३.०१.२०२२ रोजी शुद्धीपत्रक निर्गमित करून मत्सोद्योग विकास महामंडळाकडे हस्तांतरित केलेल्या किंवा भविष्यात करण्यात येणाऱ्या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | जलाशयाकरिता खुल्या ई-निविदेने कार्यवाही करण्याची मुभा मत्सोद्योग विकास महामंडळास देण्यात येणे. राज्यामध्ये विविध जलाशय आणि तलाव हे विशेषतः आदिवासी उपयोजना क्षेत्रात असून या क्षेत्रातील आदिवासी समाजासाठी ते एक महत्वाचे रोजगाराचे साधन असणे. सहजिकच आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जलाशय आणि तलाव हे भविष्यात खुल्या ई निविदेने दिल्याने या भागातील आदिवासी समाजाच्या लोकांचे पारंपारिक रोजगाराचे साधन हिरावून त्यांची उपासमार होण्याची शक्यता निर्माण होणे. त्यामुळे असे तलाव मत्सोद्योग विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याची प्रथा बंद करणे, या बाबतची शासनाची भूमिका व कार्यवाही. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४०) | ५०२५ | १० | मढ दयादिप मच्छिमार सहकारी सोसायटी लि. आणि भाटी मच्छिमार ग्रामविकास मंडळ या दोन्ही संस्था , मढ भाटी , मालाड(पश्चिम ) मुंबई येथील असून त्यांनी मच्छिमारांकरिता " मच्छिमार भवन " बांधून मिळण्या संदर्भात शासनाकडे मागणी करुनही अद्याप त्यांना " मच्छिमार भवन ' बांधून देण्यात आले नसणे, त्यामुळे मच्छिमार बांधण्यात तीव्र असंतोष निर्माण झाला असणे, शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, मच्छिमार भवन बांधून देण्याचे दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४१) | ५०२८ | १० | मढ दर्यादिप मच्छिमार सहकारी सोसायटी लि. मढ व भाटी मच्छिमार ग्राम विकास मंडळ, मढ, भाटी कोळीवाडा, मालाड पश्मिच , मुंबई या दोन्ही संस्थानी विविध समस्या संदर्भात शासनाकडे मागणी केली असणे, मढ व भाटी समुद्रात ओ.एन.जी.सी या कंपनीने तेल सर्वेक्षणाचे काम करीत असणे त्यामुळे मच्छिमारांना व्यवसाय करता येत नसणे, परिणामी मच्छिमार बांधवाना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नसणे, नुकसान भरपाई देण्या संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| (४२) | ५०२९ | १० | मढ दर्यादिप मच्छिमार सहकारी सोसायटी लि. व भाटी मच्छिमार ग्राम विकास मंडळ मढ, मालाड, पश्चिम मुंबई या दोन्ही संस्थेमधील सदस्यांनी व कोळी मच्छिमार बांधवानी मासेमारी व्यवसायाकरिता डिझेल कर खरेदी करण्यात येत असणे, डिझेल तेलावरील अबकारी कर परतावा अद्याप मिळाला नसणे, डिझेल तेलावरील परतावा थकीत झाला असणे, परतावा तातडीने मंजुर करण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत असंतोष निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४३) | ५०३० | १० | मढ दर्यादिप मच्छिमार सहकारी सोसायटी लि.मढ व भाटी मच्छिमार ग्राम विकास मंडळ, मढ , मालाड पश्चिम, मुंबई या दोन्ही संस्थाना मढ कोळीवाडयाच्या पश्चिम बाजूने असलेल्या "बारी' या खडकाळ भागावर मच्छिमारांकरिता भोतकर गल्ली, दर्यागल्ली, वांजरे गल्ली, नवपाडा, थोटे गल्ली , नवानगर व लोचरगांव येथे नौकाशाकर व मासळी सुकविण्यासाठी चौथरा बांधण्याची आवश्यकता निर्माण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | झाली असणे, याकडे संबंधित अधिका-यांने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी मच्छिमार बांधवामध्ये व स्थानिक रहिवाश्यांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| | | | **मागणी क्रमांक: डी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४५१ , सचिवालयीन-आर्थिक सेवा**<br>**रूपये:- २,४९,९७२/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (४४) | ५४१७ | १० | अमरावती जिल्हयात होणा-या वाढत्या शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासह कृषी विकासाच्या योजना शेतक-यांपर्यत पोहचविण्यासाठी कृषी सेवकांची रिक्त पदे भरण्याची नितांत आवश्यकता असणे शेतकरी कुटूंबाना आर्थिक स्थैर्य कसे मिळेल व जुन्या निकषांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असतानाही शासनाकडे याबाबत निवेदन तसेच मागणी करण्यात येऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येत नसल्याने व कृषी सेवकांची पदेही भरण्यात येत नसल्याने शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची अमलबजावणी होण्यासाठी तसेच प्रत्येक शेतकऱ्याला शासनाच्या योजनांचा विविध लाभ होण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई